
# KNOWLEDGE RESONANCE

ISSN : 2231-1629
A HALF YEARLY PEER REVIEWED REASERCH JOURNAL
(Evaluated in the SJIF Journal Masters List Evaluating Process with Impact Factor of 8.072 for Year 2021 )

A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal




Vol 10 No.2 July-Dec. 2021

Research Journal Publication Committee
Dr. M. K. Umathe College, Nagpur

A HALF YEARLY PEER REVIEWED REASERCH JOURNAL
KNOWLEDGE RESONANCE
Vol 10 No.2 July-Dec. 2021

■ Editor in Chief ■
**Dr. D. V. Naik**
Principal
Dr. M K Umathe College,
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road,
Nagpur-440022

■ Editor ■
**Dr. Mrs. K. R. Tekade**
Associate Professor
Dr. M K Umathe College,
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road,
Nagpur-440022

■ Sub-Editor ■
**Dr. Vinod B Khedkar**
Assistant Professor,
Dr. M K Umathe College,
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road,
Nagpur-440022

## EDITORIAL ADVISORS

**Dr. Mrutunjay Singh**
Principal,
C. J. Patel College,
Tiroda, Dist.

**Dr Sandhya Nair**
Principal,
R.S. Mundle Dharampeth Arts &
Commerce College, Nagpur

**Dr. P. K.U. Pillai**
Principal,
Vidyasagar Mahaavidyalaya,
Ramtek, Dist. Nagpur

**Dr. D.M. Shende**
Professor & Head
Dept. Of English, R.T.M .Nagpur
University, Nagpur

**Dr. Rajiv Kumar Malik**
Asso.Professor, Dept. of English,
K P College, Muraligang,
Dist.Dadhepura (Bihar)
Central Institute English &
Foreign Language, Hyderabad

**Dr. Sanjay Dhanwate**
Principal,
Model Arts Commerce College,
Karanja Ghadg,
Dist. Wardha

**Dr. Vilas Annaji Deshmukh**
Principal,
Yashwant Mahavidyalay,Wardha

**Dr. Urmila Dabir**
Principal,
R Kewalramani College,
Nagpur

## EDITORIAL ADVISORS

**Mr. Apurba Pal**
Director of Physical Education
Dr. M K Umathe College,
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road,
Nagpur-440022

**Prof. Sameer Naim**
Associate Professor
Dr. M K Umathe College,
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road,
Nagpur-440022

**Dr Vijay Bansod**
Associate Professor
Dr. M K Umathe College,
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road,
Nagpur-440022

**Shri. H.R. Siddewar**
Librarian
Dr. M K Umathe College,
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road,
Nagpur-440022

**The Editors or Publisher do not assume responsibility for the opinions expressed by the authors of the papers**

## ASSOCIATE EDITOR

**Dr. Akhilesh Peshve**
Principal,
Dharampeth M.P. Deo memorial
Science College, Nagpur.

**Dr. Dilip Jena**
N.M.D. College, Gondia,
Dist. Gondia

**Dr. Jeorge Augustin**
Principal, Kumbhalkar College of
Social Work, Nagpur.

**Dr. Karthik Pinicker**
Assistant Professor
J.M.Patel College, Bhandara,
Dist. Bhandara

**Dr. Sanjay Singh**
Principal
Govindrao Warjurkar College,
Nagbhid, Dist. Chandrapur

**Dr. Swain**
Professor & Head Dept. Of Sociology
R.T.M. Nagpur University,
Nagpur

**Dr. Vilas Dhone**
Asso. Professor,
Yeshwantrao Mahvidyalaya,Wardha

**Dr. S.H. Undirwade**
Professor & Head Dept. of Economecs,
R.T.M. Nagpur University, Nagpur.

**Dr. Abdul Shakeel Sattar**
Asso. Professor,
H.B.T. College, Nagpur

**Published by**
**Research Journal Publication Committee**
**Dr. M. K. Umathe College**
(Arts, Science & Ramchandrarao Mokhare Commerce College)
Lokseva Nagar, Bhamti, Ring Road, Nagpur-440022.
**Phone No.** 0712-2227062, 09421537123, **Email Id:** knowledgeresonancengp@gmail.com
**Website-** http://knowledgeresonance.com

**Printed by**
**Dinesh Graphic**
Shop No.3, 54-G, Vishnu Apartment, Trimurti Nagar, Nagpur-440 022 M. 9422119631

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# CONTENTS

| Sr. No. | Topic | Page No. |
|---|---|---|
| 1. | Impact of Covid 19 From Legal Perspective<br>Prof. Neha Kothari*, Dr. Pramila D'Souza** | 01 |
| 2. | Various Services Provided by Libraries During Covid – 19<br>Dr. Manohar Kedar | 09 |
| 3. | Comparative Analysis of Customer Satisfaction from Organized and Unorganized Retail Market<br>Seema. P. Malve | 11 |
| 4. | Public Revenue and Tax Administration of Acharya Kautilya<br>Dr. Hemraj D. Choudhari | 16 |
| 5. | Determinants of Intellectual Management and Sustainable Development as A Challenge and Way of Forward<br>Dr.(MRS). Satinder Kaur Gujral | 18 |
| 6. | Feminism: Rebuilding The Image of Women in Indian Fiction<br>Dr. Aachal Mundafale | 23 |
| 7. | Historical Consciousness and A Reading of Amitav Ghosh's The Hungry Tide<br>Ms. Sarika Deshpande | 25 |
| 8. | A Sociological Study of Dhangar Community in Western Maharashtra<br>Mr. Abhijit Abaso Patil | 29 |
| 9. | Work of Devraai in Environmental Protection: A Case Study<br>Satish Dhanawade | 32 |
| 10. | The Term Femicide: A Global Problem Faced in The Era<br>Ku. Lumbini Haridas Ganvir | 35 |
| 11. | Relevance of Gandhian Thought in Globalization Era: Impact of Mahatma Gandhi's Education Policy on New National Education Policy-2020<br>Dr. Vinod L. Sonawane | 38 |
| 12. | Rationale Behind Bank Recapitalization<br>Dr. Hemlata Namdev Kavare | 42 |
| 13. | Dalit Women: Poverty, Gender and Caste-Based Discrimination in India<br>Varsha R. Bhujbal | 47 |
| 14. | Agriculture and Climate Change in Maharashtra<br>Dr. Sujata Shende | 50 |
| 15. | Social Impacts of Sez On Farmers of Shendra Region<br>Dr. Manjusha Motiram Nalgirkar | 53 |
| 16. | Critical Analysis of Challenges & Problems of Women Administrators<br>Sangeeta Pandit Rajapurkar | 57 |
| 17. | Emerging Trends of E-Commerce in India<br>Dr. Munde Sanjeevani Dashrathrao | 61 |
| 18. | Evaluation of Vidwan Expert Database with Special Reference to Maharashtra<br>Dr. Manisha R. Khakre | 66 |

19. महाराष्ट्र में वृध्दाश्रमों में रहने वाले वृध्दों की आयु संबंधी बीमारियों की स्थिती — 72
डॉ. राजेंद बगाटे

20. गोंदिया जिल्हे के मागासवर्गिय जनसंख्या का चिकित्सक अध्ययन — 80
डॉ. बी. के. जैन

21. 'मोहन राकेश' तथा 'निर्मल वर्मा' की कहानियों में अकेलेपन का चित्रण — 84
डॉ. बालाजी जोकरे

22. डफला जमातींचे समाजशास्त्रीय अध्ययन — 87
डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)

23. महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता–भारतातील सार्वजनिक व्यवस्था व भ्रष्टाचाराच्या विशेष संदर्भात — 91
डॉ. विकास वैजिनाथ टाचले

24. उमरेड तालूक्याच्या ग्रामीण समुदायातील धर्मातंरित बौध्द समुदायाची शैक्षणिक स्थिती — 94
डॉ.रमेश एम. घोनमोडे

25. कलम 370 नंतरचे जम्मू काश्मीर — 98
प्रा. लक्ष्मन बाबाराव यादव

26. नौकरी करणाऱ्या विवाहीत स्त्रियांवर कोरोना–19 विषाणुचा झालेला मानसिक, शारीरिक, आर्थिक परीणाम व समस्या — 101
प्रा. अनिल रा. गावंडे*, प्रा. डॉ. श्याम एस. खंडारे**

27. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचे योगदान — 103
नितीन उध्दवराव जाधव

28. बंजारा समाजातील स्त्रीयांची संस्कृती आणि बदल — 106
प्रा. डॉ. उल्हास एन. राठोड

29. वृद्धावस्थाः चाहूल आणि जागरूकता — 109
डॉ. कविता आर. बोरकर

30. सेवानिवृत्त ज्येष्ठ स्त्रियांना निवृत्तीनंतर येणाऱ्या मानसिक समायोजन समस्यांचे अध्ययन — 112
लक्ष्मी सीताराम डाखोळे

31. साठोत्तरी मराठी ग्रामीण कथासाहित्य — 115
डॉ. मधुकर वि. नंदनवार

32. कोव्हिड–19 चा असंघटीत क्षेत्र व स्थलांतरीत कामगारांवरील परिणामः एक दृष्टीक्षेप — 119
डॉ. सुनिल शिंदे

33. अनुवादीत कादंबरीतील मर्म — 122
प्रा. रिता वाळके (डंभाळे)

34. गांधीवादी विकास प्रतिमानः एक विश्लेषणात्मक अध्ययन — 124
डॉ. डी. डी. भोसले

35. सरकारी कंपन्याच्या खाजगीकरणाचा परिणाम — 127
डॉ. सुधीर सुरेश ढोरे

36. कोविड–19: भारतातील शैक्षणिक ग्रंथालयांसमोरील आव्हाने आणि संधी — 130
डॉ. एकता मेनकुदळ

37. भार प्रशिक्षण कार्यक्रमाचा 10 मी. एअर रायफल नेमबाजांच्या क्रीडा कार्यमानावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास — 133
डॉ. मोहित राजेंद्र शिंदे*, अमिता स्वप्निल चेन्नापट्टन**, सौ. पूनम मोहित शिंदे***

38. भारताच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील आव्हाने — 137
डॉ. अरूण महादेव राख

39. निरीक्षणांचे निरीक्षण 139
श्रीमती मंदा प्रकाश उमाठे* डॉ. सरिता देशपांडे**
40. बेकारी सामाजिक समस्याः एक समाजशास्त्रीय अध्यन 142
प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे
41. कीर्तन परंपरेतील स्त्री अभिव्यक्ती 145
डॉ. अनघा तेंडुलकर
42. भारतातील ग्रीन बँकिंग 149
प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे*, प्रा. डॉ. श्रद्धानंद बाबासाहेब माने**
43. वर्तमान कालीन समस्यांच्या संदर्भात ज्ञानेश्वरीतील अभयमिमांसा 152
ले.– गणेश मुरलीधर बडे
44. वेठबिगारी– एक सामाजिक समस्या 158
बंडू पाटेकर
45. भारतीय सार्वजनिक उपक्रमांची विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यातील भूमिका 161
डॉ. बाळासाहेब निर्मळ
46. पर्यावरण समस्या आणि सुरक्षा 164
डॉ. आर. जी. टाले
47. व्यंकटेश माडगूळकर यांची 'सत्तान्तर': एक पुनरावलोकन 168
प्रा. शैलेश औटी
48. आदिवासी आर्थिक समस्या आणि विकास: चिकित्सक अध्ययन 174
भाग्यश्री स. होले
49. आदिवासींचे संघर्षमय जीवन 177
डॉ. सोमा पी. गोंडाणे
50. भारतीय संविधानात आदिवांसीकरिता असलेल्या विविध तरतुदी 181
डॉ.विद्या नामदेवराव खंडारे
51. संत नामदेवांच्या अभंगरचनेतील कृषिविषयक जाणिवा 186
प्रा. डॉ.ज्ञानबा महादू गाडे
52. आदिवासी साहित्य प्रवाहातील कविता व सद्य:स्थिती 188
डॉ. शिवराज काचे
53. सत्याचे प्रयोग आत्मचरित्र आणि गांधींना झालेली स्वः जाणिव 193
संजय जनार्धन आगलावे
54. विधवा महिलांच्या समस्या व समाजसुधारकांची कार्य 196
डॉ. पोपळघट राजू शेषराव
55. पर्यावरण आणि मानवी हस्तक्षेप 199
श्री. दत्तराव पंतू पवार
56. एका तेजस्विनीची चित्तरकथा: मास्तरांची सावली 202
डॉ.लक्ष्मण ना. वाघमारे
57. स्त्री मुक्ती चळवळतील राजश्री शाहू महाराज यांचे योगदान 205
देशमुख प्रतीक्षा ब्रह्मदेव
58. भविष्यातील भारत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार 207
डॉ. सागर लोकनाथ बडगे
59. Exploring Anita Desai's Fasting, Feasting with feminist view 211
Swapnil R. Dahat

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# आदिवासी साहित्य प्रवाहातील कविता व सद्य:स्थिती

**डॉ. शिवराज काचे**

*मराठी विभाग*

*राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत), लातूर*

साठोत्तरी वाड्:मय प्रवाहामध्ये महत्वाचा वाड्:मयप्रवाह म्हणून आदिवासी साहित्याला ओळखले जाते. आदिवासी म्हणजे या भूमीचे मालक असा अर्थ घेतला जातो. पण आजच्या परिस्थितीत 'आदिवासी' या शब्दप्रयोगाला विविध अर्थछटा प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे आपणास एकच एक अर्थ घेवून चालणार नाही. त्यासाठी अनेक अभ्यासक विचारवंत, संशोधक, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ ईत्यादीच्या मताचा विचार करावा लागतो. या सर्व विचारातून आदिवासी संकल्पनेचा शोध घेतला असता आपणास 'आदि' म्हणजे 'आरंभी' असे तर 'वास' म्हणजे वास्तव्य असे सुचक रूप सांगता येते. याचा अर्थ असा की, जे या भूमीवर सर्वात प्रथम वास्तव्य करून आहेत त्यांना 'मुळनिवासी' म्हटले पाहिजे. त्यांची संस्कृती ही 'मुळसंस्कृती' आहे. पण ती नागरी संस्कृती पासून दुरावलेली आहे. जो डोंगराळ दुर्गम भागात वास्तव्य करीत आहे, त्यांना स्वत:ची अशी जीवनपद्धती आहे. अशा भागात राहणारा, वास्तव्य करणारा, मुळ रहिवासी तो आदिवासी होय. आदिवासी साहित्याची संकल्पना खऱ्या अर्थाने 1960 नंतर उदयास आली. पण त्याही अगोदर या जाणीवेची चर्चा झालेली आहे. 'आदिवासी' ही संज्ञा इ.स. 1930 च्या सुमारास जयपालसिंह यांनी छोटा नागपूर (झारखंड) मध्ये पहिल्यांदा प्रचलनात आणली ते भारताच्या घटना समितीचे सदस्य होते. 'आदिवासी' म्हणजे या भूमीवरचा मुळचा रहिवासी अशा व्यापक अर्थाने हा शब्द वापरला जातो. पण साहित्यिक दृष्टिकोनातून विचार केला तर 'आदिवासी साहित्य' नाममुद्रा भद्रावती येथील पहिल्या आदिवासी साहित्य सम्मेलनामुळे साहित्य वर्तूळात अस्तित्वास आली. असे अनेक साहित्य सम्मेलने आणि 'आदिवासी साहित्यिक मित्रमेळा' याच्या अनुशंगाने ती अधिक प्रचलित झाल्याचे जाणवते.

आदिवासी म्हणजे रानात राहणारे वनवासी, दारिद्र्यात जीवन जगणारे, अर्धनग्न अवस्थेत असलेले, पशु-प्राण्यांच्या सहवासात राहणारे, राक्षस, पिश्याच्य, दैत्य, असूर, काळेकुट व आपली भाषा आणि संस्कृती अतिशय आत्मियतेने जपणारा समुह म्हणजे आदिवासी. आदिवासी म्हणजे कोण ? हे सांगताना डॉ. विनायक तुमराम म्हणतात. "सद्यस्थितीत आदिवासी हा शब्द विशिष्ट पर्यावरणात राहणाऱ्या, विशिष्ट भाषा बोलणाऱ्या, विशिष्ट जीवन पद्धतींनी व परंपरांनी नटलेल्या आणि शेकडो वर्ष जंगल पहाडात जीवन जगत असताना आपली धार्मिक आणि सांस्कृतिक मुल्ये जोपासणाऱ्या मानवसमुहाची ओळख करून देण्यासाठी वापरला जातो आणि फार मोठ्या प्रमाणावर त्यांच्या सामाजिक दु:खावर उध्वस्त प्रपंचावर हळहळ व्यक्त केली जाते. त्यांचे प्रश्न, समस्याबद्दल कळवळून बोलले जाते. कधी अर्धनग्न राहून कधी लंगोटी नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ भटकल्यामुळे त्यांना 'वन्यजमाती' म्हणून ओळखले जाते. कोणी त्यांना सहानुभूतीने 'धरतीची लेकरे' किंवा 'वनराईची लेकरे' म्हणून हाक मारतात.गिरिकुहरातील दीर्घ वास्तव्यामुळे त्यांना 'गिरिजन' हा शब्द काहिंना योग्य वाटतो. भारतमातेचे 'आदिसंतान' म्हणून आदिवासींना ओळखले जाते. अलिकडे 'आदिपुत्र' किंवा 'वनपुत्र'ही नावे देखील वापरली जातात. 'जंगलचे अनभिषिक्त राजे' म्हणून ही कोणी गौरपूर्ण उल्लेख करतात. असा विचार डॉ. विनायक तुमराम मांडतात. त्यांनी आदिवासी शब्दापासून ते त्यांच्या जीवनापर्यंतचा संपूर्ण व्यवहाराचा व्यापक पट वरील विवेचनात मांडला आहे. आदिवासी म्हणजे कोण याची जाणीव झाल्यानंतर आदिवासी साहित्य म्हणजे काय ? ते साहित्य अन्य साहित्यापेक्षा वेगळे कसे आहे याविषयी डॉ.विनायक तुमराम म्हणतात, "आदिवासी साहित्य म्हणजे किर्रर रानात-पहाडात आदिवासींना डांवणाऱ्या व्यवस्थेशी झगडणारे व तिला वठणीवर आणण्यास धजावलेले क्रांती साहित्य होय. इतर साहित्याप्रमाणे आदिवासी साहित्याला ही परिवर्तनाची अपेक्षा आहे. माणूस म्हणून जीवन जगता आले पाहिजे, म्हणजेच त्यांना हक्काची जाणीव झाली आहे. त्यांच्या अस्मितेची जाणीव झाली आहे. अस्तित्वासाठी विषमताधिष्टित समाजालाच सुरूंग लावण्याचा प्रयत्न आदिवासी साहित्यिक साहित्यातून करताना दिसतात. आदिवासी आणि काव्या यांचा संबंध फार जवळचा आहे. आदिवासींनी केवळ काव्यरचना केली नाही तर त्यांनी प्रसंगानुरूप गायन आणि नर्तनही कले आहे. अनेक अनामिक आदिवासींच्या काव्यरचना काळाच्या पडद्याआड गेल्या व कांही हाती लागल्या, त्यांना आपण 'लोकगीते' म्हणून संबोधतो. प्रसंग कोणता ही असो त्याला अनुरूप आदिवासींची काव्य रचना आहेच. महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील आदिवासी जमातींनी आपले हे मुलधन जिवाच्या मोलाने जपून पिढी-दरपिढी हस्तांतर करीत वर्तमानाच्या दारापर्यंत आणून पोहचविले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या जळत्या दुःखाला आपल्या काव्यात पहिल्यांदा स्थान दिले ते म. जोतीबा फुले यांनी

*'गोंड भिल्ल क्षेत्री होते मुळधनी,*
*इराणी मागुती, आले तेथे*
*शुर भिल्ल कोळी शराने तोडीले*
*हाकलून दिले रानोवनी'*

आदिवासी हेच या देशाचे 'मुळधनी' व 'क्षेत्रपती' असल्याचे सांगून रानावनातील त्यांच्या दुर्दशेला जबाबदार कोण हे ही स्पष्ट केले आहे. स्वातंत्र्योतर आदिवासी जीवनाचे प्रतिबिंब आढळते ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीतेत' 'दलितसेवा' या मथळ्याखाली राष्ट्रसंतांनी आदिवासींच्या ठणकत्या जखमांची आस्थेने दखल घेवून

*'कांहीनी करावा आदिसावी सुधार*
*जावोनि रानी खेड्यावर'*

असे क्रांतीवंताना आव्हान केले. केवळ काव्यरचना करून ते थांबले नाहीत,तर आदिवासींच्या टोल्या पाड्यावर जावून त्यांनी जागर घडवून आणला यवढेच नाही तर मायेच्या ममतेने आदिवासींना पोटाशी धरले. मानव्याच्या ओलाव्याने त्यांच्या उजाड मनोभूमीचे सिंचन केले. म. जोतीराव फुले यांनी आदिवासी पूर्वी कोण होते. हे सांगीतले आहेच पण त्यांच्या पूर्व परंपरेचा इतिहास पाहता गोंडवन गौंडी साम्राज्याची पायाभरणी करणारा गौंडराजा कोलभिल्ल त्याचा मुलगा भिम बल्लाळशाह, राजा संग्रामसिंह महाराणी दुर्गावती, राणी हिराई, रावण, एकलव्य, बिरसामुंडा, बाबुराव शेळमाके, तंट्या भिल्ल कुंवरसिंह वसावा अशा प्रकारचा आदिवासींना पूर्वपरंपरेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. आदिवासी साहित्याची प्रेरणा, आदिवासी लोकांचे जगणे हेच आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू, कार्ल मार्कस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आदिवासी साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायकाला' वाचा दिली. राज्यघटनेमध्ये हक्क आणि कर्तव्ये व अधिकारची तरतुद केली. त्यामुळे वाडी- तांड्यावर दऱ्याखोऱ्यात शिक्षणाची सोय झाली. निसर्ग, संस्कृती, इतिहास, भाषा, त्यांचे वास्तव समाजजीवन हीच आदिवासी साहित्याची प्रेरणा आहे. आदिवासी समाजात जे शुरवीर होऊन गेले त्यांच्या इतिहासाची नोंद आपल्या लेखनात करणे अशा लेखनप्रेरणा घेवूनच आदिवासी साहित्य अविष्कृत झाले आहे.

आदिवासी साहित्याला खऱ्या अर्थाने समृद्ध आणि संपन्न करण्यात भुजंग मेश्राम, वाहरु सोनवणे, उषाकिरण अत्राम, विनायक तुमराम, पुरूषोत्तम शेडमाके, माधव सरकुंडे, कुसुम आलाम, रवि कुसंगे, रामराजे आत्राम, बाबाराव मडावी, जनुबाई गावित, पुष्पा गावित, आदि आदिवासी साहित्यिकांनी आदिवासींच्या जीवनजाणीवा कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र इत्यादी साहित्य प्रकारात मांडले आहे. आदिवासी समाजाचे दुःख, दैन्य, दरिद्र्य, व्यथा वेदना आदिवासींतर लेखकांनी ही मांडले आहे. त्यात गों. नि. दांडेकर, दुर्गा भागवत, अनुताई वाघ, मधुकर वाकोडे, सुरेश व्दादशीवार, गोदावरी परुळेकर श्री. व्यं. केतकर, वामनराव चोरघडे, इत्यादींनी आदिवासींचे वास्तव जीवन माडण्यांचा प्रयत्न केला आहे. आदिवासी जीवन सहानुभूतीपूर्वक मांडले आहे. त्यात आदिवासींच्या अनुभवांचा धगधगता अविष्कार मात्र दिसू येत नाही. आदिवासींचे खरेखुरे जीवनदर्शन घडत नाही. त्यांनी आदिवासीविषयी जे लेखन केले ते केवळ सहानुभूतीतून केले आहे. त्याला अनुभवाची धार नाही. आदिवासी कविता ही आदिवासी साहित्याच्या गडाची पहिली पायरी असे संबोधीले जाते. या कवितेतून आदिवासी जीवनाचे वास्तव रुप प्रकटताना येते. वाहरू सोनवणे यांच्या 'गोधड' (1987) कवितासंग्रहातील 'कोर्ट' या कवितेतून कवी लोकशाही प्रणालीच्या मर्यादा सुचित करतात. कारण लोकशाहीच्या धर्तीवर स्थापित झालेली न्यायालये न्यायदानात विषमता निर्माण करतात. या व्यवस्थेत दूर्लक्षित, उपेक्षितांना यथायोग्य न्याय मिळत नसल्याची खंत या कवितेत प्रकट करतात-

*'दरवाजा खुला साक्षीला नि*
*खिडक्या बंद करून येतो*
*चोरटा आवाज खिदळण्याचा*
*देवाची शपथ खेटं बोलणार नाही*
*म्हणून म्हणत सुटुन गेले*
*अनेक गुन्हेगार याच कोर्टातून---'*

खऱ्या – चोरट्याचा न्यायनिवाडा करणाऱ्या कोर्टातून देवाची, धर्मग्रंथाची शपथ घेवून, खोटे बोलून गुन्हेगार मुक्त होतात. ही सद्यिस्थिती आपल्या देशात आहे. याचं भान त्यांच्या कवितेतून दिसून येते. राजकारणी लोक कसे आश्वासनं देतात. सामान्य लोकांना कसे फसवतात याचे चित्रणही 'हाका जखमांच्या' कवितेतून दिसून येते. राजकीय संस्कृतीतील सताधारी हिरव्या पानाखाली झोपा घेणारे बगळे आहेत. सतेच्या हिरव्या पानाचा रस आदिवासींच्या जखमांना बरे करू शकत नाही कारण—

*"हिरव्या पानाचा रस*
*जखमांना*
*बरे करू शकला नाही*
*आश्वासनाच्या*
*फुगलेल्या फोडामधून*
*रक्त पू वाहून निघत आहे*
*हाका जखमांच्या"*

राजकीय संस्कृतीच्या निव्वळ आश्वासनांममुळे आदिवासी पर्यंत कोत्याही आधुनिक सेवा-सुविधा पोहचत नाहीत. भ्रमनिरास या अभावग्रस्तपणाचे दुःखच सहन करावे लागते आहे. याची प्रचिती येते. वाहरू सोनवणे यांची 'स्टेज' ही लक्षणिय कविता आहे. सांस्कृतीक राष्ट्रवादाच्या नावाखाली हेतुपुरस्सर आदिवासींना येथिल प्रस्थापित साहित्य संस्थांनी डावलल्याचे दिसून येते. परंपरागत जातीयतेच्या उतरंडीत अतिशुद्र असलेल्या आदिवासींना खालच्या पायरीवरच बसविले या पायरीवर बसलेल्या आदिवासींना स्टेजवरून त्यांचेच दुःख ऐकविले, परंतू आदिवासींचे दुःख, व्यथा वेदना प्रस्थापितांच्या कधीच झाल्या नाहीत. अशा परिस्थितीत आदिवासींनी सुस्कारा सोडल्यास उलट त्यांनाच माफी मागण्यास भाग पाडणारी ही व्यवस्था दिसून येते-

*"आम्ही स्टेजवर गेलोच नाही*
*आणि आम्हाला बोलवलं नाही*
*बोटाच्या इशाऱ्यांनी-*
*आमची पायरी आम्हाला दाखवून दिली*
*आम्ही तिथेच बसलो*
*आम्हाला शाबासकी मिळाली*
*आणि 'ते' स्टेजवर उभे राहून*
*आमचेच दुःख आम्हाला सांगत राहिले*
*कधीच त्यांचे झाले नाही---*
*आमची शंका आम्ही कुजबुजलो*
*ते कान टवकारून ऐकत राहिले*
*नि सुस्कारा सोडला*
*आणि आमचेचे कान धरुन*
*आम्हाला दम भरला*
*माफी मागा नाहीतर---!*

खरे तर आदिवासींच्या दुःखाची जातकुळी भिन्न आहे. माणूस म्हणून जगायचे आहे.पण अनेकांनी त्यांच्या दुःखाचे भांडवल केले आहे. त्यांच्या माणूसपणाच्या भूमिकेमागे दमणकारी यंत्रणाच क्रियाशील असल्याचे या कवितेतून सुचित होते. प्रा. विनायक तुमराम हे एक आदिवासी कार्यकर्ते व कवी आहेत. आदिवासी कवीच्या प्रथम पिढीतील ते जेष्ठ कवी आहेत. त्यांचा 'गोंडवण पेटले आहे'(1987) हा पहिलाच काव्यसंग्रह होय.या संग्रहातील 'एकलव्य' या कवितेतही वर्णव्यवस्थेचा बळी ठरला आहे. कवि या कवितेत निषादपुत्र,श्रेष्ठ धनुर्धारी,आदिवासी कुलभूषण एकलव्या बरोबर संवाद साधत आहे. येथील वर्णव्यवस्थेने एकलव्यचा केलेला क्रुर तेजोवध हाच कवीच्या विद्रोहाचा कुळारंभ ठरला आहे. एकलव्याचं धनुर्धारीपण येथील वर्णवादी व्यवस्थेला, वर्णवादाचं समर्थन करणाऱ्या द्रोणाचार्यांनाही मान्य नव्हते. कविने एकलव्याची विरता, शुरत्ववृत्ती, त्याचे वनवासीपण व कुशलता पाहिली नसताना त्यानी त्याला मित्रवर म्हटले आहे. कारण-

*'मित्रवर ! तुझ्या भात्यातील तळपणाऱ्या तीक्ष्ण तीरांना*
*करणार आहे मी*
*क्रांतीच्या नशाली अन्*
*तुझ्या अंगठ्यातून सांडलेल्या रक्ताने*
*लिहिणार आहे मी इथल्या सुवर्णशाहीचा मृत्यूलेख*
*कारण वेदनांनी भरलेले*
*तुझे वनवासी जीवन*
*मीही वर्णबळी म्हणून जगतो आहे'*

कवि एकलव्य मित्रवर्यांच नातं जोपासून त्यांच्या तिक्ष्ण तीरांचा वापर करुन क्रांतीच्या अंगठ्यातून सांडलेल्या रक्ताने आर्यसंस्कृतीचा मृत्यूलेख लिहिणार आहे. कारण एकलव्याच्या दुःखाशी कवी ही समदुःखी आहे. सद्यस्थितीत वर्णव्यवस्थेचा दाहक अनुभव कवी ही अनुभवताना दिसून येतो. 'उलगुलान' हा भुजंग मेश्रामम यांचा पहिलाच कवितासंग्रह (1990) आहे. 'उलगुलान' म्हणजे बिहारमधील आदिवसी क्रांतीकारक बिरसा मुंडाच्या क्रांतीकारक चळवळीची ती घेषणा आहे. म्हणजे आदिवासींचं शोषन करणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध सर्वकष विद्रोह पुकारणे होय. 'उलगुलान' मध्ये आदिवासी स्त्री हा कविच्या चिंतनाचा विषय होय. आदिवासी स्त्री ही धाडसी आहे, शुर आहे. परिस्थितीनुसार अंगार बनणारं आदिम स्त्रीत्व कधी कधी पुरुषांच्या वासणांध वृतीला बळी पडतं हे वास्तव भुजंग मेश्राम यांच्या '29 जून 1980' या कवितेतून लक्षात येते. या कवितेतून कविने मारेगाव येथील (यवतमाळ) बयना कवडू कोडपे या कोलाम आदिम जमातीच्या स्त्रीवर दिनांक 29 जून 1980 रोजी बलात्कार झाला. वासनांध पुरूषांनी बलात्कार करून तिची हत्या केली. आदिम स्त्रीयांच्या जीवनात भूक, दारिद्रय हे प्रश्न भिषण तर आहेतच, परंतू आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरं होऊन ही स्त्री छळाची ही कथा अत्यंत अमानुष आहे.

*'परवा परवाचं आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरले*
*मीही मोहरलो, पुन्हा कालच तुझी बातमी आली.*
*'29 जून 1980 : बयना कवडू कोडपे'*
*सर्व सगळ्या अनुदान पुनर्वसनांचे तत्वज्ञान मी झुंगारुन टाकले'*

कवीला आंतरराष्ट्रीय महिला वर्ष, त्या निमित्ताने होणारी स्त्रीप्रश्नाची चर्चा, स्त्री अन्याय, अत्याचार, शोषणातून मुक्ती महत्वाची वाटते. आदिम स्त्रीयांवर होणारे अन्याय अत्याचार याची वास्तवीकता कवी कवितेतून मांडताना दिसून येतो. नर्मदा नदी व आदिवासी याचे नो अतूट आहे. हे सर्वश्रूत आहे. हेच नाते कवी 'बातचीत नर्मदेशी' या कवीतेत जोपासतात. नर्मदेच्य खोऱ्यात तिच्या पाण्यावर आदिवासींचे

पोषण झाले आहे. अशा नदीवर नर्मदा सरोवर झाल्यामुळे आदिवासी विस्तापित झाले आहेत. या नदीशी कवी संवाद साधत आहे. मध्यमवर्गातील आलेल्या जंगल ठेकेदारांनी व निसर्गप्रेमींनी जंगल बचाव, पश्चिमघाट बचाव, चिपको आंदोलन इ. माध्यमातून आदिवासी विषयक उपरी बांधिलकी केवळ प्रसिद्धीसाठी आरंभल्याची भावना कवी प्रकट करतात. कारण-

*'जंगलाचे ठेकेदार पेरतात पर्यावरणी चळवळ*
*गंगेच्या व्यभिचारी पोटात होते मळमळ*
*चिपकून चिपकून घट वाचवताना*
*फ्रंटपेजवर त्यांची बांधिलकी-कळकळ*
*आम्ही कितीही पेटवले रान*
*तरी ठरतो फुटकळ'*

बिगर आदिवासींच्या जंगल बचाव मोहिमांना वारेमाप प्रसिद्धी मिळते. खऱ्या आदिवासींनी पेटविलेल्या विद्रोहाची साधी दखल सुद्धा प्रसिद्धी माध्यमे घेत नाहीत. उलट आदिवासींनाच टोळधाड समजले जाते. वास्तविक आर्यांनी अनार्यांवर केलेल्या आक्रमनाची नर्मदा साक्षीदार आहे. नर्मदेने फसव्या अथांगतेला रोखावं आणि आदिमांच्या गतिमान प्रवाहाची कदर करावी. अशी अपेक्षा कवीने प्रकट केली आहे. वास्तविक पहाता सर्वसामान्याच्या आवाजाला,उठावाला कौवडीची किंमत मिळते आहे. सर्वसामान्याचा आवाज हा आक्रोश ठरतच नाही ही सद्य:स्थिती पहावायास मिळते आहे. प्रा. वामन शेळमाके हे आदिवासी साहित्य चळवळीती एक व्यापक द्रष्टी असलेले सृजनशील प्रतिभावंत कवी आहेत. त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह 'जागवा मने पेटवा मशाली' (1991) आहे. या संग्रहातील 'जंगलचा राजा' या कवितेतून प्राचीन काळात जंगलचा राजा असणारा आदिवासी आजच्या वर्तमानात मात्र उपाशी,कष्टकरी, भटका,भिकारी,पूर्वीचं राजवैभव गमावलेला, बेकारीत जीवन जगणारा बेघर असून सुद्धा तो इमानाशी मात्र प्रामाणिक आहे. कारण –

*'जंगलचा राजा आहे स्वाभिमानी*
*विकली नाही संस्कृती प्रस्थापितांच्या बाजारी'*

प्रस्थापितांच्य शोषक बाजारामध्ये आदिवासींनी आपला स्वाभिमान गहाण ठेवलेला नाही. एवढेच नाही, तर कितीही वाईट परिस्थिती आली तरी आदिवासी समाज हा इतर समाजासारखा रस्त्यावर भिक मागताना दिसत नाही. ही सद्य:स्थिती आपणास दिसून येते. डॉ. गोविंद गारे हे आदिवासी साहित्याचे अभ्यासक, भाष्कार आहेत. विशेष म्हणजे आदिवासी समाजाचे ते चिंतक आहेत. संकलन संशोधन या संदर्भात त्यांची विपूल ग्रंथ निर्मिती आहे. असे असले तरी त्यांचा मुळातला पिंड सृजनशील कवींचा आहे म्हणून ते आदिवासी कवितेच्या प्रांतातील एक जेष्ट कवी आहेत. त्यांचा पहिलाच कवितासंग्रह 'अनुमती' (1994) प्रसिद्ध झाला आहे. या संग्रहातील 'विकासाचे तारतम्य' ही वर्तमान वस्तुस्थितीचे दिग्दर्शन करणारी कविता आहे. भाषण देणारा नेता आणि ऐकणारा प्रेक्षक अशा दोन्हीचा ही काव्यमय संवाद आहे. 'व्यवस्था परिवर्तन' हा भाषणाचा विषय असतो, परंतू भाषण ऐकणारा काही प्रश्न निर्माण करतो की, धर्म, जात, धनिक, सबलता, राजकीय सत्ताधारी इ. सर्वामध्ये परिवर्तन शक्य आहे काय ? लोकांचे प्रश्न सोडविने ही कल्यानकारी राज्यप्रणाली आहे, परंतू मुलगामी समाजपरिवर्तन गेल्या पन्नासवर्षात झालेच नाही. गेल्या पन्नास वर्षात देशाची विकासनीती व तिचे तारतम्य काय सांगते. हे कवितेतून साकार होते.उदा-

*'मोठ्या धरणाच्या प्रकल्पासाठी*
*भूमिपुत्राकडून जमिनी घेऊन*
*त्यांचे कडूनच त्याग करविला जातो*
*हे आमचं विकासाचं तारतम्य आहे'*

दुर्बल समजल्या जाणाऱ्या आदिवासीकडून मोठ्या धरणांसाठी जमिनी हडप केल्या जातात. देशासाठी त्याग करण्याचे धडे त्यांना शिकवून त्यांनाच विस्तापित केले जाते. हे विकासाचे तारतम्य प्रस्तापित बाळगतात.आदिवासींच हे विस्तापन समाजवाद, साम्यवाद, लोकशाही, बंधूप्रेम या शब्दांची पाखरण करुन केली जाते. जागतिकीकरणाच्या रेट्यात तर हा प्रश्न अधिक गडद दिसतो आहे. विकासाच्या नावाखाली होत असलेली जंगलतोड ही आदिवासी समुहाला अतिशय घातक ठरत आहे. त्यांचे जंगल या भूमी बळकावण्याचा हा एक कटच दिसून येतो. ही वास्तविकता सद्य:स्थितीत अपणास दिसून येते.

**सारांश -**

आदिवासी समाजाला वनवासी असे संबोधले जाते. 'वनवासी' म्हणजे वनात राहणारे पण सामाजिक दृष्टीकोणातून विचार केल्यास आदिवासींच्या जीवनात किती वनवास आहे. हे अनेक कविंच्या कवितेतून दिसून येते. आदिवासींना माणूस म्हणून जगणे अजून शक्य होत नाही. कारण ही समाज व्यवस्था आनखी त्यांच्याकडे दुय्यम नजरेने पहाताना दिसून येते. आदिम समाज आज ही समस्येच्या गर्तेत जीवन जगत आहे. असे अनेक कवींच्या कवितेतून दिसून येते. ही सद्य:स्थिती आपणास मान्य करावीच लागते.

**निष्कर्ष -**

१. साठोत्तरी वाङ्:मय प्रवाहातील एक महत्वाचा वाङ्:मय प्रवाह म्हणून आदिवासी साहित्याकडे पाहिले जाते.
२. या समाजव्यवस्थेत आदिवासी सारख्या सामान्य माणसाला जीवन जगणे कठीन झाल्याचे काव्यातून निदर्शनास येते.

३. राजकीय संस्कृतीच्या केवळ आश्वासनामुळे आदिवासी समाजापर्यंत कोणत्याही आधुनिक सेवा-सुविधा पोहचत नाहित याचे चित्रण काव्यातून दिसून येते.

४. आदिमांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क आजतागायत मिळत नाही.

५. केवळ वर्णव्यवस्थेमुळे सवर्णांनी आदिमांना आपल्या टाचेखाली दाबून ठेवल्याचे भिषण वास्तव काव्याच्या माध्यमातून निदर्शनास येते.

६. जागतिकीकरणामुळे होत असलेली जंगलतोड ही आदिमांच्या संस्कृतीचा संहार आहे. असे चित्र आदिवासी कव्यातून दिसून येते.


**संदर्भग्रंथ -**

१. *'साठोत्तरी मराठी वाङ्:मयातील प्रवाह', डॉ. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि. 251 क, शनिवार पेठ, पुणे- 411030, व्दि.आ. 6 डिसेंबर 2014*

२. *'आदिवासी मराठी साहित्य सवरुप आणि समस्या', संपा. डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रतिमा प्रकाशन, 1362 सदाशिव पेठ, पुणे- 411030, प्र. आ. 30 जानेवारी 2007*

३. *'साहित्य विविधा आणि समीक्षा', प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे, प्रतिमा पब्लिकेशन पुणे, 8 अभिनव अपार्टमेंट, गुरुविहार कॉलनी, भोसरी पुणे- 411039, प्र. आ. 4 मार्च 2018*

४. *'आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास', डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, स्वरुप प्रकाशन, 'अक्षर', 858 सह्याद्री नगर, एन-5 (सिडको), औरंगाबाद – 431003, व्दि. आ. 17 नोव्हेंबर 2012*



Published by

**Research Journal Publication Committee**

**Dr. M. K. Umathe College**
Bhamti, Ring Road, Nagpur-22 Phone No. 0712-2227062
E-mail: knowledgeresonancengp@gmail.com